**Effective from: 30/09/2026**

# Terms of Use

These Terms of Use ("Terms") govern your access to and use of www.samvedanaanalytics.com (the "Website"), operated by Samvedana Analytics LLP (LLPIN: ACV-3507) ("Samvedana", "we", "us" or "our"). By accessing or using the Website, you agree to these Terms. If you do not agree, please do not use the Website.

## 1. About us

Samvedana Analytics LLP is a limited liability partnership registered in India, with its registered office at 1001, Manisha Pride, J. Nehru Road, Mulund (West), Mumbai – 400080, Maharashtra. We provide social impact assessment, monitoring and evaluation, CSR reporting, ESG and Social Stock Exchange advisory services.

## 2. Informational purpose only — not professional advice

The content on this Website — including descriptions of our services, resources, checklists, articles, FAQs, and references to laws, rules and regulatory frameworks — is provided for general information only. It is not legal, financial, regulatory, tax, or professional advice, and must not be relied upon as such.

Laws and regulations change, and their application depends on the specific facts of each case. Statutory references and regulatory positions on this Website may not reflect the most current position. Before acting on anything you read here, you should obtain advice from a qualified professional who can consider your specific circumstances. A formal engagement with Samvedana is created only by a signed written agreement, not by use of this Website.

## 3. No professional relationship

Using this Website, submitting an enquiry, or receiving a response does not create any assessor–client, advisory, or other professional relationship between you and Samvedana. Such a relationship arises only when both parties sign a written engagement agreement. Until then, no obligations of any engagement apply.

## 4. Use of the Website

You may use the Website for lawful purposes only. You agree that you will not:

- Use the Website in any way that breaches any applicable law or regulation;
- Submit false, misleading, or fraudulent information, or impersonate any person or organisation;
- Submit, through the enquiry form, any third party's personal data or any confidential beneficiary data;
- Introduce any virus, malware, or other harmful code, or attempt to gain unauthorised access to the Website, its server, or any connected system;
- Interfere with or disrupt the Website, or place an unreasonable load on its infrastructure;
- Scrape, harvest, or systematically extract data or content from the Website without our prior written consent; or
- Use the Website's content for any commercial purpose without our permission.

## 5. Intellectual property

All content on this Website, including text, graphics, logos, layout, design, resources, and downloadable materials, is the intellectual property of Samvedana Analytics LLP, or is used by us under licence, and is protected by applicable intellectual property laws.

You may view and download content for your own internal, non-commercial reference. You may not otherwise copy, reproduce, republish, distribute, modify, or create derivative works from any content without our prior written permission. Any trademarks, names, or logos of third parties shown on the Website (including those of infrastructure we license) belong to their respective owners and are used for identification only.

## 6. Downloadable resources

Some resources on this Website link to official government, regulator, or third-party sources. Those materials are the property of their respective publishers and are subject to their own terms. We provide links and summaries for convenience; we do not warrant that any linked or summarised material is current, complete, or accurate, and we are not responsible for third-party content.

## 7. Enquiries and your submissions

When you submit an enquiry, the personal data you provide is handled in accordance with our Privacy Policy. You confirm that any information you submit is accurate, that you are entitled to provide it, and that it does not infringe any third party's rights. We may retain and act on your enquiry as described in the Privacy Policy.

## 8. Disclaimer of warranties

The Website is provided on an "as is" and "as available" basis. To the fullest extent permitted by law, we make no warranties or representations, express or implied, about the Website or its content — including as to accuracy, completeness, currency, reliability, fitness for a particular purpose, or uninterrupted or error-free availability. Any reliance you place on the Website's content is at your own risk.

## 9. Limitation of liability

To the fullest extent permitted by applicable law, Samvedana Analytics LLP, its partners, employees and associates will not be liable for any indirect, incidental, special, consequential or punitive loss, or any loss of profit, revenue, data, goodwill or opportunity, arising out of or in connection with your access to or use of, or inability to use, the Website or its content — whether based in contract, tort, or otherwise, and even if we have been advised of the possibility of such loss.

Nothing in these Terms excludes or limits any liability that cannot be excluded or limited under applicable Indian law. This clause does not affect the obligations that apply under a separate signed engagement agreement, which are governed by that agreement.

## 10. Indemnity

You agree to indemnify and hold harmless Samvedana Analytics LLP and its partners and employees from any claim, loss, liability, or expense (including reasonable legal costs) arising from your breach of these Terms, your misuse of the Website, or your infringement of any law or third-party right through your use of the Website.

## 11. Third-party links

The Website may contain links to third-party websites. We provide these for convenience and do not endorse, and are not responsible for, their content, products, or privacy practices. Accessing linked websites is at your own risk and subject to their terms.

## 12. Availability and changes to the Website

We may modify, suspend, or discontinue any part of the Website at any time without notice. We do not guarantee that the Website will always be available or free from errors, and we are not liable for any unavailability.

## 13. Changes to these Terms

We may update these Terms from time to time. The current version, with its effective date, will always be available on this page. Your continued use of the Website after a change takes effect means you accept the updated Terms.

## 14. Governing law and jurisdiction

These Terms are governed by and construed in accordance with the laws of India. Subject to any right a consumer may have under applicable law to approach another forum, the courts at Mumbai, Maharashtra shall have jurisdiction over any dispute arising out of or in connection with these Terms or the Website.

## 15. Severability and waiver

If any provision of these Terms is held to be invalid or unenforceable, that provision will be severed and the remaining provisions will continue in full force. Our failure to enforce any right or provision is not a waiver of that right or provision.

## 16. Entire agreement

These Terms, together with the Privacy Policy, constitute the entire agreement between you and Samvedana in relation to your use of the Website, and supersede any prior understanding on that subject. Where you have a separate signed engagement agreement with us, that agreement governs the services provided under it.

## 17. Contact

Questions about these Terms may be sent to contact@samvedanaanalytics.com.

*— End —*

अंमलबजावणीची तारीख : 30/09/2026

# वापराच्या अटी

या वापराच्या अटी संवेदना अनॅलिटिक्स एलएलपीने (LLPIN: ACV-3507) ("संवेदना", “आम्ही”, “आम्हाला” किंवा “आमचे”) कार्यान्वित केलेल्या www.samvedanaanalytics.com या संकेतस्थळावर तुमचा प्रवेश आणि त्याचा वापर याचे नियमन करतात. या संकेतस्थळावर प्रवेश केल्यास किंवा त्याचा वापर केल्यास, तुम्हाला या अटी मान्य आहेत असे समजले जाईल. जर तुम्हाला या अटी मान्य नसतील, तर कृपया हे संकेतस्थळ वापरू नये.

## 1. आमच्या विषयी

संवेदना अनॅलिटिक्स एलएलपी एक भारतात नोंदवलेली मर्यादित दायित्व भागीदारी आहे. नोंदणीकृत कार्यालय 1001, मनीषा प्राईड, जे नेहरू रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई – 400080, महाराष्ट्र इथे आहे. आम्ही सामाजिक प्रभाव मूल्यांकन; संनियंत्रण आणि मूल्यमापन, CSR अहवाल सादरीकरण, ESG आणि सोशल स्टॉक एक्स्चेंज सल्लागार सेवा प्रदान करतो.

## 2. केवळ माहितीसाठी – व्यावसायिक सल्ला नाही

या संकेतस्थळावरचा मजकूर – आमच्या सेवांबद्दल माहिती, संसाधने, पडताळणी याद्या, लेख, वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) आणि कायदे, नियम आणि नियामक चौकटी – सामान्य माहितीसाठी पुरवला गेला आहे. ही माहिती कायदेशीर, आर्थिक, नियामक, करविषयक किंवा व्यावसायिक सल्ला नाही, आणि त्या दृष्टीने यावर अवलंबून राहू नये.

कायदे आणि नियम बदलत असतात आणि त्यांची अंमलबजावणी प्रत्येक प्रकरणातील विशिष्ट वस्तुस्थितीवर अवलंबून असते. या संकेतस्थळावरील कायदेशीर संदर्भ आणि नियामक स्थिती कदाचित अद्ययावत स्थिती दर्शवित नसतील. येथे वाचलेल्या माहितीच्या आधारे कोणतीही कृती करण्यापूर्वी, आपण एखाद्या पात्र व्यावसायिकाचा सल्ला घ्यावा, जे आपल्या विशिष्ट परिस्थितीचा विचार करू शकतील. ‘संवेदना’सोबतचे अधिकृत व्यावसायिक सेवा-संबंध केवळ स्वाक्षरी केलेल्या लेखी करारामुळेच प्रस्थापित होतात; या संकेतस्थळाच्या वापरामुळे नाही.

## 3. व्यावसायिक नाते नाही

या संकेतस्थळाचा वापर केल्याने, चौकशी केल्याने किंवा प्रतिसाद मिळाल्याने तुमच्यात आणि 'संवेदना'त मूल्यमापनकर्ता-अशील (assessor–client), सल्लाविषयक किंवा इतर कोणतेही व्यावसायिक नाते निर्माण होत नाही. असे नाते केवळ तेव्हाच निर्माण होते जेव्हा दोन्ही पक्ष एका लेखी करारावर स्वाक्षरी करतात. तोपर्यंत, कोणत्याही व्यावसायिक संबंधांशी निगडीत कोणतीही बंधने लागू होत नाहीत.

## 4. संकेतस्थळाचा वापर

तुम्ही या संकेतस्थळाचा वापर फक्त कायदेशीर उद्देशांसाठीच करू शकता. खालील गोष्टी तुम्ही करणार नाही याची तुम्ही सहमती देता:

- कोणत्याही लागू असलेल्या कायद्याचे किंवा नियमांचे उल्लंघन होईल अशा प्रकारे संकेतस्थळाचा वापर करणे;
- खोटी, दिशाभूल करणारी किंवा फसवणूक करणारी माहिती सादर करणे, किंवा कोणत्याही व्यक्तीची किंवा संस्थेची खोटी ओळख धारण करणे;
- चौकशी अर्जाद्वारे कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीची वैयक्तिक माहिती किंवा लाभार्थ्यांची गोपनीय माहिती सादर करणे;
- कोणताही व्हायरस, मालवेअर किंवा इतर हानिकारक कोड (code) प्रणालीत आणणे, अथवा संकेतस्थळ, त्याचा सर्व्हर किंवा त्याच्याशी जोडलेल्या कोणत्याही प्रणालीमध्ये अनधिकृत प्रवेश मिळवण्याचा प्रयत्न करणे;
- संकेतस्थळामध्ये हस्तक्षेप करणे किंवा त्यात व्यत्यय आणणे, अथवा त्याच्या पायाभूत सुविधांवर (infrastructure) अवाजवी ताण टाकणे;
- आमच्या पूर्व-लेखी संमतीशिवाय संकेतस्थळावरून डेटा किंवा मजकूर 'स्क्रॅप' करणे, संकलित करणे किंवा पद्धतशीरपणे काढून घेणे;
- आमच्या परवानगीशिवाय संकेतस्थळावरील मजकुराचा कोणत्याही व्यावसायिक उद्देशासाठी वापर करणे.

## 5. बौद्धिक संपदा

या संकेतस्थळावरील मजकूर, ग्राफिक्स, लोगो, मांडणी (layout), डिझाइन, संसाधने आणि डाउनलोड करण्यायोग्य साहित्य यांसह सर्व सामग्री ही 'संवेदना अनॅलिटिक्स एलएलपी'ची बौद्धिक संपदा आहे किंवा ती आमच्याद्वारे परवान्या अंतर्गत वापरली जात आहे; तसेच ती लागू असलेल्या बौद्धिक संपदा कायद्यांद्वारे संरक्षित आहे.

तुम्ही तुमच्या स्वतःच्या अंतर्गत आणि बिगर-व्यावसायिक संदर्भासाठी मजकूर पाहू शकता आणि तो डाउनलोड करू शकता. आमच्या पूर्व लेखी परवानगीशिवाय, तुम्ही या मजकूराची प्रत करणे, पुनरुत्पादन करणे, पुनर्प्रकाशित करणे, वितरण करणे, त्यात बदल करणे किंवा त्यावरून नवीन निर्मिती करणे यांसारख्या गोष्टी करू शकत नाही. संकेतस्थळावर दर्शविलेले तृतीय पक्षांचे कोणतेही ट्रेडमार्क, नावे किंवा लोगो (ज्यामध्ये आम्ही परवाना घेतलेल्या पायाभूत सुविधांशी संबंधित बाबींचाही समावेश आहे) हे त्यांच्या संबंधित मालकांच्या मालकीचे आहेत आणि त्यांचा वापर केवळ ओळख पटवण्यासाठी केला जातो.

## 6. डाउनलोड करता येणारी संसाधने

या संकेतस्थळावरील काही संसाधने सरकारी, नियामक किंवा तृतीय-पक्षीय अधिकृत स्रोतांशी जोडलेली आहेत. ती सामग्री संबंधित प्रकाशकांची मालमत्ता असून ती त्यांच्या स्वतःच्या अटी व शर्तींच्या अधीन आहे. आम्ही केवळ सोयीसाठी या लिंक्स आणि सारांश उपलब्ध करून देतो; अशा प्रकारे जोडलेली किंवा सारांशित केलेली सामग्री अद्ययावत, पूर्ण किंवा अचूक असल्याची आम्ही हमी देत नाही आणि तृतीय-पक्षीय मजकूरासाठी आम्ही जबाबदार नाही.

## 7. चौकश्या आणि तुमचे सादरीकरण

जेव्हा तुम्ही एखादी चौकशी सादर करता, तेव्हा तुम्ही पुरवलेली वैयक्तिक माहिती आमच्या गोपनीयता धोरणानुसार हाताळली जाते. तुम्ही सादर केलेली माहिती अचूक आहे, ती पुरवण्याचा तुम्हाला अधिकार आहे आणि त्यामुळे

कोणत्याही त्रयस्थ पक्षाच्या अधिकारांचे उल्लंघन होत नाही, याची तुम्ही पुष्टी करता. गोपनीयता धोरणात नमूद केल्याप्रमाणे, आम्ही तुमची चौकशी जतन करू शकतो आणि त्यावर कार्यवाही करू शकतो.

## 8. हमींबाबत अस्वीकरण

हे संकेतस्थळ 'जसे आहे तसे' (as is) आणि 'जसे उपलब्ध आहे तसे' (as available) या तत्त्वावर उपलब्ध करून दिलेले आहे. कायद्याने अनुमत असलेल्या पूर्ण मर्यादेपर्यंत, आम्ही या संकेतस्थळाबद्दल किंवा त्यावरील मजकूराबद्दल कोणतीही हमी किंवा प्रतिपादन (स्पष्ट किंवा सूचित) करत नाही — ज्यामध्ये अचूकता, पूर्णता, अद्ययावतपणा, विश्वासार्हता, विशिष्ट उद्देशासाठी उपयुक्तता किंवा अखंड आणि त्रुटी-मुक्त उपलब्धता यांचा समावेश आहे. या संकेतस्थळावरील मजकूरावर तुम्ही अवलंबून राहिल्यास, ती पूर्णपणे तुमच्या स्वतःच्या जोखीमेवर असेल.

## 9. दायित्वाची मर्यादा

लागू असलेल्या कायद्यानुसार अनुमत असलेल्या पूर्ण मर्यादेपर्यंत, संवेदना अनॅलिटिक्स एलएलपी, तिचे भागीदार, कर्मचारी आणि सहयोगी हे — तुम्ही संकेतस्थळ किंवा त्यावरील मजकूर वापरलात, वापरण्याचा प्रयत्न केलात किंवा वापरू शकला नाहीत, यांमुळे किंवा त्या संदर्भात उद्भवणाऱ्या कोणत्याही अप्रत्यक्ष, प्रासंगिक, विशेष, परिणामी किंवा दंडात्मक नुकसानीस, अथवा नफा, महसूल, डेटा, प्रतिष्ठा किंवा संधीच्या कोणत्याही नुकसानीस — जबाबदार राहणार नाहीत; मग ती जबाबदारी करार, अपकृत्य (tort) किंवा इतर कशावरही आधारित असो, आणि अशा नुकसानीच्या शक्यतेबद्दल आम्हाला पूर्वकल्पना दिली गेली असली तरीही.

या अटींमधील कोणतीही गोष्ट, लागू भारतीय कायद्यानुसार वगळता किंवा मर्यादित करता न येणारे कोणतेही दायित्व वगळत नाही किंवा मर्यादित करत नाही. हे कलम स्वतंत्रपणे स्वाक्षरी केलेल्या प्रतिबद्धता करारांतर्गत लागू होणाऱ्या दायित्वांवर परिणाम करत नाही, जे त्या कराराद्वारेच नियंत्रित होतात.

## 10. नुकसान भरपाई

या अटींचे उल्लंघन, संकेतस्थळाचा गैरवापर किंवा संकेतस्थळाच्या वापराद्वारे कोणत्याही कायद्याचे किंवा त्रयस्थ पक्षाच्या अधिकारांचे उल्लंघन केल्यामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही दाव्यापासून, नुकसानीपासून, दायित्वापासून किंवा खर्चापासून (वाजवी कायदेशीर खर्चासह) संवेदना अनॅलिटिक्स एलएलपी आणि त्यांचे भागीदार व कर्मचारी यांना नुकसान भरपाई देण्यास आणि त्यांना सुरक्षित ठेवण्यास तुम्ही सहमती देता.

## 11. तृतीय पक्षीय दुवे (लिंक्स)

या संकेतस्थळावर तृतीय-पक्ष संकेतस्थळांचे दुवे (लिंक्स) असू शकतात. आम्ही ते केवळ सोयीसाठी उपलब्ध करून देतो; त्यांवरील मजकूर, उत्पादने किंवा गोपनीयता धोरणांचे आम्ही समर्थन करत नाही आणि त्यांसाठी आम्ही जबाबदारही नाही. अशा लिंक्सद्वारे संबंधित संकेतस्थळांना भेट देणे ही तुमची स्वतःची जोखीम असेल आणि ती त्या संकेतस्थळांच्या अटी व शर्तींच्या अधीन असेल.

## 12. संकेतस्थळाची उपलब्धता आणि त्यातील बदल

आम्ही कोणत्याही वेळी पूर्वसूचनेशिवाय या संकेतस्थळाचा कोणताही भाग बदलू शकतो, स्थगित करू शकतो किंवा बंद करू शकतो. हे संकेतस्थळ सदैव उपलब्ध असेल किंवा त्यात कोणत्याही त्रुटी नसतील, याची आम्ही हमी देत नाही; तसेच, संकेतस्थळ उपलब्ध नसल्यास त्याबाबत आम्ही जबाबदार राहणार नाही.

## 13. या अटींमधे बदल

आम्ही वेळोवेळी या अटींमध्ये सुधारणा करू शकतो. अद्ययावत आवृत्ती आणि ती लागू होण्याची तारीख या पृष्ठावर नेहमी उपलब्ध असेल. बदल लागू झाल्यानंतरही तुम्ही संकेतस्थळाचा वापर सुरू ठेवल्यास, याचा अर्थ असा होतो की तुम्ही अद्ययावत अटी स्वीकारल्या आहेत.

## 14. लागू होणारा कायदा आणि अधिकारक्षेत्र

या अटी भारताच्या कायद्यांनुसार नियंत्रित आणि अर्थान्वित केल्या जातील. लागू कायद्यान्वये ग्राहकाला अन्य मंचाकडे दाद मागण्याचा अधिकार असल्यास तो अधिकार अबाधित राखून, या अटी किंवा संकेतस्थळ यांमधून किंवा त्यांच्याशी संबंधित उद्भवणाऱ्या कोणत्याही वादाबाबत मुंबई, महाराष्ट्र येथील न्यायालयांचे अधिकारक्षेत्र असेल.

## 15. विलीनीकरण क्षमता आणि हक्कत्याग सोड

या अटींमधील कोणतीही तरतूद अवैध किंवा अंमलबजावणीस अयोग्य ठरल्यास, ती तरतूद वगळली जाईल आणि उर्वरित तरतुदी पूर्णपणे लागू राहतील. एखाद्या अधिकाराची किंवा तरतुदीची अंमलबजावणी न करणे, म्हणजे त्या अधिकाराचा किंवा तरतुदीचा त्याग करणे नव्हे.

## 16. संपूर्ण करार

हे नियम आणि गोपनीयता धोरण एकत्रितपणे, संकेतस्थळाच्या तुमच्या वापराबाबत तुमच्यात आणि 'संवेदना'त झालेला संपूर्ण करार तयार करतात आणि या विषयावरील कोणत्याही पूर्व-समजुतीची जागा घेतात. जर तुमचा आमच्याशी एखादा स्वतंत्र स्वाक्षरीकृत प्रतिबद्धता करार असेल, तर त्या करारांतर्गत पुरवल्या जाणाऱ्या सेवांचे नियमन तोच करार करतो.

## 17. संपर्क

या अटींविषयी प्रश्न असल्यास येथे संपर्क करू शकता : contact@samvedanaanalytics.com.

*— समाप्त —*